# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १६१ | शुक्रवार, २ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### आंबेडकरी अनुयायांना नाश्ता व चहाची सोय

**लोणी काळभोर, ता. १ :** भिमा कोरेगाव येथे शौर्य दिनानिमित्त मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या आंबेडकरी अनुयायांना जेवण, नाश्ता व चहाची सोय थेऊर गाव व थेऊर फाटा येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तसेच लोणी काळभोर येथील सिद्धार्थ संघ तरुण मंडळ व भिमसत्ता प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली. थेऊर गाव येथे चिंतामणी विद्यालयाजवळ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने दोन हजार जणांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) हवेली तालुका अध्यक्ष मारुती कांबळे, दलीत महासंघाचे पुणे जिल्हाध्यक्ष आनंद वैराट, ग्रामपंचायत सदस्य गौतमी कांबळे, सामाजिक कार्यकर्ते राहुल गायकवाड हे आपल्या कार्यकर्त्यांसमवेत भोजनाची व्यवस्था पहात होते. थेऊर फाटा येथे लोणी काळभोर येथील सिद्धार्थ संघ तरुण मंडळ व भिमसत्ता प्रतिष्ठान यांच्या वतीने शितल कांबळे, ॲड. सुजित कांबळे, सोसायटीचे माजी चेअरमन संजय भालेराव, लोणी काळभोर ग्राम पंचायतीचे माजी सरपंच भोलेनाथ शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली चहा, पाणी, बिस्किट, पोहे याची व्यवस्था करण्यात आली होती.

# लोणी काळभोरमध्ये ग्राहकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता नेट सुविधा थेट बंद

## हजारो इंटरनेट ग्राहकांना आर्थिक फटका; प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. १: शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोरसह परिसरात खाजगी इंटरनेट सुविधा बुधवारी (ता. ३१) रात्री बारा वाजण्याच्या सुमारास बंद करण्यात आली आहे. इंटरनेट सुविधा अचानक बंद केल्यामुळे याचा हजारो ग्राहकांना फटका बसला आहे. तर दुकानदार, रुग्णालये, शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयांचे व्यवहार अडचणीत आले असून त्याचा दैनंदिन काम काजावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.




पेरणे फाटा येथील विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी दरवर्षी राज्याच्या काना-कोपऱ्यातून लाखो भीम अनुयायी येतात. त्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे शहर पोलिस उपायुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे यांनी महाराष्ट्र राज्य गृह विभागाचे अतिरिक्त सचिव यांनी खाजगी इंटरनेट सुविधा बंद करण्यासाठी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार लोणी काळभोर व वाघोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खाजगी इंटरनेट सुविधा बंद करण्याचे आदेश दिले होते. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे दोन्ही पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांनी काटेकोरपणे पालन केले.

पोलीस प्रशासनाने खाजगी इंटरनेट चालविणाऱ्या चालक व मालकांसाठी एक आदेश जारी केला. आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी इंटरनेट सुविधा बुधवारी (ता. ३१) रात्री बारा ते गुरुवारी (ता. १) रात्री अकरा वाजेपर्यंत बंद करण्यासाठी सांगितले. त्यानुसार खाजगी इंटरनेट चालकांनी याची कुठल्याही ग्राहकाला कल्पना न देता नेट सुविधा थेट बंद केली. याचा ग्राहकांना खूप मोठा आर्थिक फटका बसला आहे. तर कर्मचाऱ्यांना कामावर येवून स्वतःच्या कपाळावर हात धरण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, कुंजीरवाडी, थेऊर व तरडे या गावांमध्ये मोठमोठ्या कंपन्या, शैक्षणिक संकुले, दुकाने, दवाखाने, वित्तीय संस्था, नागरी सुविधा केंद्रे व विविध कार्यालये आहेत. या संस्थांमध्ये हजारो काम गार वर्ग काम करत आहेत. सध्या आधुनिक युग चालू असल्याने सर्व व्यवहार हे इंटरनेटच्या माध्यमातून होतात. कामगारांना कामावर हजेरी लावण्यासाठीसुद्धा पंचिंग करावी लागत आहे. परंतु, इंटरनेट सुविधा बंद पडल्यामुळे काम गारांना तासंतास एकाच जागेवर खोळंबत बसावे लागले. काही कार्यालये नेट बंद केल्यामुळे आज बंद ठेवावी लागली. याचा अनेक कार्यालयांना खूप मोठा आर्थिक फटका बसला आहे.

**मोबाईल इंटरनेट सुविधा चालू कशी?**

शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खाजगी इंटरनेट सुविधा बंद केली आहे. प्रशासनाचा हा निर्णय अतिशय योग्य आहे. परंतु, मोबाईल इंटरनेट सुविधा चालू ठेवली आहे. जर एखादी घटना घडली तर मोबाईलवरून लवकर व्हायरल होऊ शकते? त्यामुळे प्रशासनाला नेमके साध्य काय करायचे आहे. ते अद्यापपर्यंत न समजलेले कोडे आहे. प्रशासनाच्या या निर्णयावर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**आदेश 'लोणीकंद'साठी की 'लोणी काळभोर'साठी?**

मागील अनेक वर्षापासून भीमा कोरेगाव येथे शौर्य दिनानिमित्त इंटरनेट सुविधा बंद केली जाते. ठीकठिकाणी जामर लावले जातात. परंतु, यावर्षी लोणी काळभोरला खाजगी इंटरनेट सुविधा बंद करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश लोणीकंद ऐवजी चुकून लोणी काळभोरला तर झाले नसतील ना? असा सवाल नागरिकांच्या मनात उपस्थित झाले आहेत. परंतु. या आदेशामुळे नागरिकांची मोठी दमछाक झाली आहे.

> डिजीटल युगात इंटरनेट व नेटवर्क सुविधा अत्यावश्यक आहे. इंटरनेट सुविधा बंद केल्यामुळे अत्यावश्यक सेवांवर अवलंबून असलेल्या ग्राहकांच्या कामकाजात अडचणी निर्माण झाल्या आहेत. कोणतीही पूर्वसूचना अथवा पर्यायी व्यवस्था न करता नेट बंद करणे म्हणजे नागरिकांच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रकार आहे. या प्रकारामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयाचा आम्ही जाहीर निषेध करत आहे. या सुविधेमुळे त्रस्त झालेल्या ग्राहकांनी तक्रारी कराव्यात. आम्ही आवाज उठवून संघटनेच्या माध्यमातून न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
>
> - **संदीप शिवरकर,** (अध्यक्ष - अखिल भारतीय ग्राहक पंचायत हवेली तालुका)

> पंचक्रोशीत आमचे नावाजलेले दुकान आहे. नवीन वर्षानिमित्त अनेक ग्राहकांनी आमच्या दुकानात भेटी दिल्या. कामावर सर्व कर्मचारी हजर आहेत. परंतु, इंटरनेट चालकांनी कोणतीही कल्पना न देता इंटरनेट सुविधा बंद केली आहे. बिलिंग करता येत नसल्यामुळे अनेक ग्राहक माघारी गेले आहेत. त्यामुळे आम्हाला खूप मोठा आर्थिक फटका असला आहे. याबाबत आम्ही ग्राहक पंचायत समितीकडे दाद मागणार आहेत. तसेच पोलीस ठाण्यात तक्रारही देणार आहे.
>
> - **एक ग्राहक,** (लोणी काळभोर, ता. हवेली)

# राज ठाकरेंचे शिलेदार गायब! मनसेच्या उमेदवाराचे निवडणुकीपूर्वीच अपहरण?

**अहिल्यानगर, ता. १ :** राज्यात महापालिका निवडणुकीचं वातावरण चांगलंच तापलं आहे. निवडणूक आयोगानं कार्यक्रम जाहीर केल्यानंतर सगळे पक्ष जोरात मैदानात उतरले आहेत. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. ३० डिसेंबरला उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानं आता कोण कुणाविरुद्ध लढणार, कोणाला कुठल्या पक्षाकडून तिकीट मिळालंय, हे चित्र जवळपास स्पष्ट झालं आहे.



अशातच अहिल्यानगरमधून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत उभे असलेले मनसेचे दोन उमेदवार अचानक गायब झाले आहेत. गेल्या तासांपासून त्यांचा कुटुंबीयांशीही संपर्क नाही, अशी माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ आणि सुमित वर्मा यांनी दिली आहे.

केडगाव परिसर संवेदनशील असल्यामुळे निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठीच हे अपहरण झालं असावं, असा संशय विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष सुमित वर्मा यांनी व्यक्त केला आहे. प्रभाग क्रमांक मधील राहुल जाधव आणि अंबरनाथ भालसिंग अशी या गायब उमेदवारांची नावं आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या दोघांपैकी एक उमेदवार भाजपच्या, तर दुसरा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या उमेदवाराविरुद्ध निवडणुकीच्या रिंगणात होता. या प्रकरणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, गायब उमेदवारांचा तात्काळ शोध घ्यावा अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या सगळ्या घडामोडींमध्ये मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाची युतीही चर्चेचा विषय ठरतेय. तब्बल वर्षांनंतर ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. त्यामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत ही युती महायुतीसाठी मोठं आव्हान ठरू शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# पुण्यातील चार सदस्यांच्या उमेदवारीवर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले..

**पुणे, ता. १ :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना पुणे शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिल्या गेलेल्या काही उमेदवारींमुळे राजकीय वर्तुळात चर्चा आणि टीका सुरू झाली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबांतील चार सदस्यांना उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप होत असून, त्यापैकी तीन महिला उमेदवार आहेत. विशेष म्हणजे यातील दोन उमेदवार कारागृहातूनच निवडणूक लढवणार आहेत. यावर आता अजित पवारांनी स्पष्टीकरण दिले आहे.

नाना पेठेतील आयुष कोमकर खून प्रकरणातील आरोपी आणि सध्या तुरुंगात असलेल्या सोनाली



आंदेकर व लक्ष्मी आंदेकर, तसेच कुख्यात गुंड गजानन मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा अधिकृत एबी फॉर्म घेऊन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्यावर विरोधकांकडून तीव्र टीका होत आहे.


या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट करताना अजित पवार म्हणाले, आजपर्यंत झालेल्या सर्व निवडणुका बघा. आमची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) यांच्याशी युती आहे. त्यांना काही जागा सोडण्यात आल्या आहेत. त्या जागांवर उमेदवार देण्याचा अधिकार संबंधित पक्षाचा असतो. याबाबत मी स्वतंत्र पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देणार आहे. माझी काम करण्याची पद्धत सर्वांनाच माहिती आहे.

शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारी आणि एबी फॉर्म वाटपाबाबत गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती, असेही त्यांनी स्पष्ट केले. याच कारणामुळे डबल एबी फॉर्म, उमेदवारांमध्ये नाराजी अशा घटना घडल्या, असे अजित पवार यांनी नमूद केले.

दरम्यान, या उमेदवारींवरून पुण्यातील महापालिका निवडणूक प्रचारात राजकीय आरोप-प्रत्यारोपांना अधिकच धार चढताना दिसत आहे.

# ऊसतोडणीसाठी छत्तीसगडहून आलेल्या मजुरांच्या दोन मुलींवर दोघांकडून अत्याचार

**बीड, ता. १ :** जिल्ह्यातून संतापजनक प्रकार समोर आला आहे. माजलगाव तालुक्यातील एका गावात ऊसतोडणीसाठी आलेल्या छत्तीसगड येथील मजुरांच्या दोन अल्पवयीन मुलींवर स्थानिक दोघा नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोन्ही आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



समोर आलेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील एका गावात छत्तीसगड राज्यातून सुमारे १४ कुटुंबे ऊसतोडणीच्या कामासाठी आली होती. मुलींचे आई वडील नातेवाईक २४ डिसेंबर रोजी दुपारच्या वेळी शेतात ऊस तोडणीसाठी गेले असताना दोन अल्पवयीन मुली झोपडीत एकट्याच होत्या. वेळ साधून गावातील दोन तरुणांनी मुलींना फसवले आणि बाहेर घेऊन गेले.

दरम्यान यातील एक किराणा दुकानदार तर दुसरा ट्रॅक्टर चालक असल्याचेसमोर आले आहे. आरोपींनी दोन्ही अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने शेतांमध्ये नेऊन त्यांच्यावर अत्याचार केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. अत्याचार करून आरोपींनी मुलींना जीवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या मुलींनी घडलेला प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र, चार दिवसांनंतर, २८ डिसेंबरला त्यातील एका पीडितेने घडलेली घटना आपल्या वडिलांना सांगितली. त्यानंतर दुसऱ्या मुलीनेही सांगितले.


घडलेला प्रकार ऐकून ऊसतोड मजुरांनी थेट पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद दिली. या फिर्यादीच्या आधारे पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# दौंड बसस्थानकाचा होणार कायापालट; राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश, ७ कोटींचा निधी मंजूर

**राहुलकुमार अवचट**

पुणे, ता. १ : दौंडकरांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. दौंड बसस्थानक आणि एसटी आगाराच्या नूतनीकरणासाठी अखेर ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार ॲड. राहुल कुल यांनी या कामासाठी सातत्यानं केलेल्या पाठपुराव्याला यश आलं असून राज्य शासनाच्या परिवहन व गृह विभागानं या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांची मागणी आता पूर्ण होणार आहे.

सध्या दौंड बसस्थानकाची अवस्था चांगली नाही, कर्मचाऱ्यांनाही अनेक अडचणींना सामोरं जावं लागत होतं. हे लक्षात





घेऊन आमदार राहुल कुल यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी लावून धरली होती. अखेर ३१ डिसेंबर २०२५ रोजी शासन निर्णय जाहीर झाला आणि बसस्थानकाच्या कायापालटाचा मार्ग मोकळा झाला.

या मंजूर निधीतून बसस्थानक आणि आगाराचा पूर्ण चेहरामोहरा बदलणार आहे. मुख्य आगार इमारत पूर्णपणे दुरुस्त केली जाणार असून चालक-वाहकांसाठी टॉयलेटसह आरामदायी विश्रांतीगृह उभारलं जाणार आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृह तर लाईन चेकिंग पथकासाठी वेगळी खोलीही असणार आहे.

तसंच २ कोटी ७७ लाख रुपयांहून अधिक खर्चून आगार आणि बसस्थानक परिसराचं कॉँक्रीटीकरण केलं जाणार आहे. यामुळे पावसाळ्यातला चिखल आणि उन्हाळ्यातली धूळ कायमची इतिहासजमा होणार आहे. याशिवाय कॅश इशू सेक्शन, लेखा विभाग आणि आगार व्यवस्थापकांसाठी नवीन इमारती बांधल्या जाणार आहेत. पाणी साठवणुकीसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग, आधुनिक अग्निशमन व्यवस्था, संरक्षण भिंत आणि नवीन प्रवेशद्वारही उभारण्यात येणार आहे.

काम सुरू करण्याआधी वास्तुविशारदांकडून नकाशे मंजूर करून घेतले जाणार असून तांत्रिक परवानग्याही आवश्यक असतील. काम दर्जेदार व्हावं यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांचं काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या निधीमुळे दौंडमधील नागरिकांमध्ये समाधानाचं वातावरण आहे, आणि आता बसस्थानकाचं काम कधी सुरू होतंय, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

## संक्षिप्त

### भाजपच्या उमेदवार पूजा मोरे यांची पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीतून माघार

**पुणे, ता. १ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक २ मधून भारतीय जनता पक्षाने पूजा मोरे जाधव यांना उमेदवारी दिली होती. मात्र त्यांच्या मागील काही वर्षांतील विधानांचा संदर्भ देत भाजप कार्यकर्ते आणि संघ समर्थकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या विरोधानंतर अखेर पूजा मोरे जाधव यांना उमेदवारी अर्ज माघारी घ्यावा लागला. अर्ज माघारी घेतल्यानंतर भावुक झालेल्या पूजा मोरे जाधव या आपल्या पती धनंजय जाधव यांच्या गळ्यात पडून रडल्या. पूजा मोरे जाधव यांनी सांगितले की, गरिबीतून संघर्ष करत त्या इथपर्यंत पोहोचल्या असून त्यांच्या नशिबात त्याग लिहिलेला आहे. मी हिंदुत्वाची विचारधारा समजून घेतली आहे, मला भाजप आणि संघ कार्यकर्त्यांनी स्वीकारावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. पुण्यातील प्रभाग क्रमांक २ मधून त्यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. प्रत्यक्षात त्यांना प्रभाग क्रमांक १ मधून उमेदवारी अपेक्षित होती. मात्र पक्षाने निर्णय बदलत त्यांना प्रभाग क्रमांक २ मधून एबी फॉर्म दिला होता.उमेदवारी जाहीर होताच समाज माध्यमांवर भाजप कार्यकर्ते आणि संघ समर्थकांनी पक्षावर टीका सुरू केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणाऱ्या व्यक्तीला उमेदवारी कशी दिली, असा सवाल करण्यात आला. तसेच पहलगाम हल्ल्याच्या वेळी दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या नाहीत, असे विधान पूजा मोरे यांनी केल्याचे जुने वक्तव्य पुढे आणण्यात आले. या पार्श्वभूमीवर त्या हिंदुत्ववादी नसल्याचा आरोप करण्यात आला.

### महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे, ता. १ :** आगामी महानगरपालिका निवडणूक २०२६ शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी पुणे शहर पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. परिमंडळ-१ अंतर्गत खडक, डेक्कन आणि फरासखाना पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातील गंभीर गुन्हे, अंमली पदार्थ तस्करी तसेच मकोका अंतर्गत गुन्ह्यांमध्ये सहभाग असलेल्या एकूण ९ सराईत आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करत त्यांना १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. महानगरपालिका निवडणुकीदरम्यान सराईत गुन्हेगारांचा प्रभाव राहू नये, निवडणूक प्रक्रिया भयमुक्त आणि सुरळीत पार पडावी तसेच सामान्य नागरिकांना निर्भयपणे मतदान करता यावे, या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त पुणे शहर अमितेश कुमार यांनी दिलेल्या आदेशानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ च्या कलम १२९ अन्वये ही प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व आरोपींना १४ दिवसांसाठी येरवडा मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

# पुणे मनपात ३०५९ अर्जांपैकी २७०३ उमेदवारांचे अर्ज वैध तर १७४ अर्ज बाद

**संतोष मुंडे**

पुणे, ता.१: पुणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची बुधवारी (ता. ३१) अत्यंत चुरशीच्या वातावरणात छाननी करण्यात आली. यावेळी पुणे महानगर पालिकेच्या १६५ सदस्यांच्या निवडणुकीसाठी ३१७९ उमेदवार पात्र ठरले आहेत. राज्यात ही पात्र उमेदवारांची संख्या सर्वात जास्त आहे. तर पात्र उमेदवारांच्या बाबतीत पुण्यानंतर ब्रह्ममुंबई महानगर पालिकेचा दुसरा नंबर लागतो. येथे २२७ जागांसाठी २५१६ उमेदवार पात्र ठरल्याचे समोर आले आहे.

पुण्यात महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सकाळी सुरू झालेली ही प्रक्रिया विरोधी उमेदवारांनी घेतलेले आक्षेपामुळे सुनावणी बुधवारी (ता.३१) रात्री उशिरापर्यंत सुरू होती. एकूण ३०५९ अर्जांपैकी १७४ अर्ज विविध तांत्रिक कारणांमुळे बाद ठरवण्यात आले असून, २७०३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याचे समोर आले आहे. तर राज्याचं आयटी हब म्हणून पुढे आलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत १२८ जागांसाठी १९९३ उमेदवार पात्र ठरल्याची माहिती मिळत आहे. यामुळे आता खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या रणांगणाचा पारा चढलेला दिसून येत आहे.

पुणे महानगरपालिकेच्या ४१ प्रभागांमधील १६५ जागांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यंदा चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीमुळे इच्छुक उमेदवारांची संख्या वाढली आहे. प्रभागातील प्रत्येक जागेसाठी साधारणतः १० ते १२ उमेदवारांनी नशीब अजमावले असून, यात राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांसह अपक्षांचाही मोठा भरणा आहे. ५ ते ६ प्रभागांमध्ये उमेदवारांनी एकमेकांच्या अर्जांवर गंभीर स्वरूपाचे आक्षेप घेतल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना अर्जाच्या पडताळणीस वेळ लागला.

अर्ज छाननीदरम्यान प्रामुख्याने जातीचे दाखले अवैध असणे, प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती देणे, विवाह प्रमाणपत्रातील त्रुटी, महापालिकेचा मिळकतकर थकीत असणे आणि ना-हरकत प्रमाणपत्र जोडलेले नसणे, अशा मुद्द्यांवरून हरकत नोंदवण्यात आली होती. अनेक ठिकाणी यावरून उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वादावादी घडून आली. बावधन-भुसारी कॉलनी,येरवडा-कळस-धानोरी, औंध-बाणेर आणि वानवडी या प्रभागांमध्ये उमेदवारी अर्जावर आक्षेप कमी होते. यामुळे येथील निकाल लवकर जाहीर करण्यात आले. मात्र, उर्वरित ठिकाणी रात्री उशिरापर्यंत उमेदवार अर्जाच्या निकालाच्या प्रतीक्षेत होते.

अनेक प्रस्थापित नेत्यांच्या उमेदवारीवर विरोधकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. प्रभाग ३६ मधून निवडणूक लढविणारे माजी सभागृहनेते सुभाष जगताप यांच्या अर्जावरही आक्षेप घेण्यात आला होता. तो फेटाळण्यात आला. तसेच प्रभाग ७ (गोखलेनगर-वाकडेवाडी) मध्ये भाजपच्या उमेदवार रेश्मा अनिल भोसले यांच्यावर मालमत्ता कराची थकबाकी असल्याचा आक्षेप आम आदमी पार्टीच्या उमेदवाराने घेतला होता, मात्र सुनावणीअंती त्यांचा अर्ज वैध ठरला. तसेच प्रभाग २ मधील राष्ट्रवादीच्या उमेदवार नंदिनी सिद्धार्थ धेंडे आणि काँग्रेसचे अविनाश बागवे यांच्या अर्जांवरील हरकतीही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळून लावल्या.

छाननी प्रक्रियेत सर्वाधिक चर्चा रंगली ती शिवसेना (ठाकरे गट) आणि भाजपमधील वादाची. शिवसेना उमेदवारांनी अर्जासोबत केवळ 'बी' फॉर्म जोडला असून 'ए' फॉर्म जोडलेला नाही, असा आक्षेप भाजपने विविध क्षेत्रीय कार्यालयांत घेतला. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे आपल्या उमेदवारांना हे अर्ज बाद करण्यासाठी दबाव निर्माण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, शिवसेनेने 'ए' फॉर्म यापूर्वीच निवडणूक उपायुक्तांकडे जमा केल्याचे पुरावे सादर केल्यानंतर भाजपचे सर्व आक्षेप फेटाळण्यात आले.

या प्रक्रियेनंतर आता उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, त्यानंतरच प्रत्येक प्रभागातील लढतींचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

## शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाला उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून अभिवादन





**भीमा कोरेगाव, ता. १ :** भीमा कोरेगाव येथे आज (ता. १) २०८ वा शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या ऐतिहासिक दिनानिमित्त राज्यासह देश भरातून लाखो भीम अनुयायी विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी दाखल झाले आहेत उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही सकाळी भीमा कोरेगाव येथे उपस्थित राहून विजयस्तंभाला अभिवादन केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही विजयस्तंभाला मानवंदना दिली. प्रशासनाने केलेल्या व्यापक तयारीबाबत समाधान व्यक्त करत हा लढा जातीप्रथा आणि अन्यायकारक व्यवस्थेविरोधातील होता, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांनी यावेळी सांगितले की, मी आज येथे अभिवादन करण्यासाठी आलो आहे. प्रशासनाने चांगली तयारी केली असून आवश्यक सर्व निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. भाविकांसाठी योग्य आणि सुरक्षित व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारनंतर गर्दी अधिक वाढण्याची शक्यता आहे.

आज भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. त्या ऐतिहासिक लढाईतील शूरवीरांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली. शौर्य दिनानिमित्त परिसरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, भाविकांच्या सोयीसाठी वाहतूक, आरोग्य आणि स्वच्छतेच्या विशेष व्यवस्था करण्यात आल्या आहेत. शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने हा ऐतिहासिक दिवस साजरा व्हावा, यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे.



## डीएसके प्रकरणातील ठेवीदारांची अंतिम यादी संकेतस्थळावर जाहीर

**पुणे, ता. ३१ :** ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यात आवश्यक कागदपत्रे सादर केलेल्या ठेवीदारांची अंतिम यादी पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

डी. एस. कुलकर्णी यांच्याविरुद्ध २०१७ मध्ये ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. या प्रकरणातील ठेवीदारांसाठी यापूर्वी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात ठेवीदारांनी आवश्यक कागदपत्रे पोलिसांकडे सादर केली होती. त्यानुसार कागदपत्रांची पूर्तता केलेल्या ठेवीदारांची अंतिम यादी आर्थिक गुन्हे शाखेकडून तयार करण्यात आली आहे. ही यादी पुणे पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर (punepolice.gov.in) प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच ठेवीदारांची वैयक्तिक माहिती टेलिग्राम बॉटच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती आर्थिक व सायबर गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा संखे यांनी दिली.




## नववर्षाच्या सुरुवातीस इंडिया पोस्टकडून मोठा निर्णय

**नवी दिल्ली, ता. १ :** नववर्षाच्या सुरुवातीस इंडिया पोस्टकडून टपाल सेवांमध्ये महत्त्वाचे बदल लागू करण्यात येत आहेत. १ जानेवारी २०२६ पासून काही आंतरराष्ट्रीय पत्र व लहान पॅकेट मेल सेवा बंद करण्याचा निर्णय टपाल विभागाने घेतला आहे. विकसित होत असलेल्या जागतिक ई-कॉमर्स मानकांशी टपाल सेवा सुसंगत करणे, तसेच ग्राहकांचा अनुभव, सेवा विश्वासार्हता, ट्रॅकेबिलिटी आणि सुरक्षितता वाढवणे हा या सुधारणांचा मुख्य उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

'द इकॉनॉमिक टाईम्स' च्या एका वृत्तानुसार, सेवा अधिक सक्षम करण्याच्या प्रक्रियेत टपाल विभागाने आंतरराष्ट्रीय पत्र पोस्टमधील काही सेवा तर्कसंगत करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या सेवांमध्ये ट्रॅकिंगची सुविधा उपलब्ध नाही किंवा अत्यंत मर्यादित आहे, अशा सेवांचा या निर्णयात समावेश आहे. अधिक जबाबदार आणि ग्राहक केंद्रित पर्यायांना प्रोत्साहन देण्यावर सरकारचा भर आहे.

युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या नव्या निर्णयांनुसार, १ जानेवारीपासून नोंदणीकृत लहान पॅकेट सेवा बंद करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर समुद्रमार्गे किंवा हवाई मार्गे परदेशात लहान पॅकेट्स व इतर साहित्य पाठवण्याची सुविधा देखील उपलब्ध राहणार नाही. बाह्य टपाल वस्तूंसाठी सरफेस लेटर मेल सेवा तसेच सरफेस एअर लिफ्टेड लेटर मेल सेवा बंद करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय घेण्यामागे अनेक कारणे असल्याचे सांगण्यात येते. लहान पॅकेट सेवांमध्ये अपुरी किंवा शून्य ट्रॅकिंग सुविधा, वितरणासाठी लागणारा जास्त कालावधी, गंतव्य देशांतील कडक सीमाशुल्क व सुरक्षा नियम, तसेच अनेक परदेशी टपाल प्रशासनांकडून अशा वस्तूंची कमी स्वीकृती या अडचणींवर उपाय म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. या बदलांमुळे आंतरराष्ट्रीय टपाल सेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि आधुनिक होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## पतीने शून्यातून कंपनी उभी केली; पत्नीने डाव साधून सगळंच हडपलं!

**पुणे, ता. १ :** पुण्यातील एका कौटुंबिक वादाच्या प्रकरणात सत्र न्यायालयाने पतीला मोठा दिलासा दिला आहे. भागीदारी व्यवसायातील पैशांच्या गैरवापरामुळे निर्माण झालेल्या वादात, पत्नीच्या व्यावसायिक कर्जाचे हप्ते पतीने भरावेत, असा कनिष्ठ न्यायालयाचा आदेश सत्र न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे पतीवर टाकण्यात आलेला मोठा आर्थिक भार दूर झाला आहे.

सागर आणि निता (नावे बदललेली) यांनी लग्नानंतर एकत्र येऊन भागीदारीत व्यवसाय सुरू केला होता. सुरुवातीला दोघेही व्यवसाय पाहत होते. मात्र, काही काळानंतर पत्नीने पतीला न सांगता व्यवसायातील नफ्याचा वापर स्वतःच्या वैयक्तिक खर्चासाठी केल्याचा आरोप पतीने केला. याशिवाय कंपनीच्या व्यवहारांमध्ये खोटी कागदपत्रे दाखवून पैशांची अफरातफर केल्याचेही पतीच्या लक्षात आले. या प्रकारामुळे दोघांमध्ये वाद वाढत गेला.

पतीने या प्रकरणी रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर पत्नीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करत घटस्फोटासाठी अर्ज करण्यात आला. याला उत्तर म्हणून पत्नीने पती आणि सासरच्या मंडळींवर कौटुंबिक हिंसाचार आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले. या सर्व घडामोडींमुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे झाले.

दरम्यान, कौटुंबिक न्यायालयाने पत्नीच्या बाजूने निर्णय देत पतीने भागीदारी व्यवसायाचे आणि गोल्ड लोनचे ७५ टक्के हप्ते भरावेत, असे आदेश दिले होते. या कर्जाची एकूण रक्कम सुमारे ८८ लाख रुपये होती. या निर्णयाविरोधात पतीने सत्र न्यायालयात धाव घेतली.

सत्र न्यायालयात झालेल्या सुनावणीत पतीकडून बँक स्टेटमेंट, पत्नीचे संशयास्पद आर्थिक व्यवहार, कंपनीचा ताबा पत्नीने घेतल्याचे पुरावे आणि पत्नीचे स्वतंत्र उत्पन्न या बाबी सादर करण्यात आल्या. या सर्व बाबींचा विचार करून सत्र न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी कनिष्ठ न्यायालयाचा आदेश चुकीचा ठरवला. कंपनीचा ताबा घेऊन आर्थिक गैरव्यवहार केल्यानंतर कर्जाचा भार पतीवर टाकणे योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे पत्नीचा अर्ज फेटाळण्यात आला.

## गॅसच्या किमतीत वाढ, सीएनजी–पीएनजी स्वस्त; १ जानेवारीपासून नवे दर लागू



**मुंबई, ता. १ :** देशात नवीन वर्षाचे स्वागत होत असतानाच १ जानेवारी २०२६ रोजी तेल कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत थेट १११ रुपयांची वाढ केली आहे. ही दरवाढ आजपासून लागू करण्यात आली असून याचा मोठा फटका हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांना बसणार आहे. व्यावसायिक सिलिंडर महागल्यामुळे बाहेरचे जेवण देखील महाग होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दर महिन्याच्या पहिल्या दिवशी सरकारी पेट्रोलियम कंपन्या दरांचा आढावा घेतात आणि त्याप्रमाणे हे नवीन दर आज निश्चित करण्यात आले आहेत.

या दरवाढीमध्ये व्यावसायिक गॅस महागला असला तरी घरगुती वापराच्या सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. सामान्य कुटुंबांसाठी ही दिलासादायक बाब आहे, कारण त्यांच्या घराचे बजेट यामुळे बिघडणार नाही. यासोबतच विमान इंधन म्हणजेच एटीएफच्या दरात कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे विमान प्रवास करणाऱ्यांना थोडा फायदा होऊ शकतो. तसेच सीएनजी आणि पीएनजीच्या किमतींमध्येही काही प्रमाणात घट करण्यात आली आहे.

डिसेंबर महिन्यात व्यावसायिक सिलिंडरचे दर केवळ १ रुपयाने कमी झाले होते, मात्र आता नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच मोठी दरवाढ झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## पुण्यात गेल्या ५ वर्षात पहिल्यांदाच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये घट



**पुणे, ता. १ :** पुणे शहरातील महिलांच्या सुरक्षेबाबत एक अतिशय दिलासादायक माहिती समोर आली असून गेल्या ५ वर्षात प्रथमच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये घट पाहायला मिळाली आहे. पुणे पोलीस दलाने नुकतीच २०२५ सालातील गुन्हेगारीची आकडेवारी जाहीर केली आहे. या माहितीनुसार शहरात बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यांचे प्रमाण २०२४ च्या तुलनेत कमी झाले आहे. गेल्या ४ वर्षांपासून हा आलेख सातत्याने वर जात होता, मात्र २०२५ मध्ये प्रथमच हा वाढता वेग रोखण्यात पोलिसांना यश आले आहे.

आकडेवारीवर नजर टाकली तर असे दिसून येते की, २०२४ मध्ये शहरात बलात्काराच्या ४९९ घटनांची नोंद झाली होती, जी २०२५ मध्ये ४७३ आहे. तसेच विनयभंगाच्या प्रकरणांमध्येही घट झाली असून ८४४ वरून हा आकडा ८३६ वर पोहोचला आहे.

**येथे पाहा आकडेवारी**

वर्ष : २०२१ बलात्काराच्या घटना : २८३ विनयभंगाच्या घटना : ३८२

**वर्ष : २०२४ (सर्वोच्च पातळी)**

बलात्काराच्या घटना : ४९९

विनयभंगाच्या घटना : ८४४

**वर्ष : २०२५ (ताज्या नोंदी)**

बलात्काराच्या घटना : ४७३

विनयभंगाच्या घटना : ८३६

पुणे पोलिसांच्या महिला सुरक्षा कक्षाने राबवलेले विविध उपक्रम आणि प्रभावी कामगिरीमुळे ही परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना २०२५ मध्ये मिळालेला हा ब्रेक भविष्यातील सुरक्षित पुण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

## बीडमध्ये एका पोलिस कर्मचाऱ्याने महिलेला गुंगीचे औषध देऊन केला अत्याचार



**बीड, ता. १ :** एका विभक्त महिलेला लग्नाचे खोटे आश्वासन देऊन एका पोलिस कर्मचाऱ्याने फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आरोपीने पीडित महिलेच्या वैयक्तिक अडचणींचा फायदा घेत तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेने बीड आणि धाराशिव येथील पोलिस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दिली असून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

पीडित महिला सन २०२२ पासून पतीपासून वेगळी राहत होती. या परिस्थितीचा फायदा घेत धाराशिव येथे कार्यरत असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्याने तिच्याशी संपर्क साधला. आपण पोलीस असल्याने न्यायालयीन कामात मदत करतो, असे सांगून त्याने तिचा विश्वास संपादन केला. तसेच स्वतःचे वैवाहिक आयुष्य बिघडले असून लवकरच घटस्फोट घेऊन तिच्याशी लग्न करणार असल्याचे आश्वासन दिले, असे तक्रारीत नमूद आहे.

१० ऑगस्ट २०२५ रोजी आरोपीने महिलेला माजलगाव येथील एका लॉजवर नेले. तेथे लग्नाचे आश्वासन देत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. या वेळी आरोपीने काही औषधांचे सेवन केल्यामुळे महिलेला गंभीर दुखापत झाली. तिला रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले असून टाके घालावे लागल्याचेही तक्रारीत नमूद आहे. उपचाराचा खर्च आरोपीने ऑनलाइन पद्धतीने भरल्याची माहिती समोर आली असून तो पुरावा म्हणून महत्त्वाचा मानला जात आहे.

काही दिवसांनंतर महिलेने लग्नाबाबत विचारणा केली असता आरोपीने नकार देत अपमानास्पद वागणूक दिली. आपण पोलीस असल्याने कुणीही आपले काही बिघडवू शकत नाही, अशी धमकी देत जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच खासगी फोटो व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही नमूद आहे.

या घटनेमुळे पोलिस दलातील काही व्यक्तींकडून कायद्याचा गैरवापर होत असल्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पीडित महिलेने बलात्कार, गंभीर इजा, धमकी आणि अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून निष्पक्ष चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## बंटी जहागिरदार हत्या प्रकरणातील आरोपी अटकेत

**अहिल्यानगर, ता. १ :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर शहरात जर्मन बेकरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी बंटी जहागीरदार याची बुधवारी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर अचानक गोळीबार केला. एवढ्या मोठ्या आणि चर्चेत असलेल्या प्रकरणातील आरोपीची अशा पद्धतीने हत्या झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी बंटी जहागीरदार हा कब्रस्तानमधून आपल्या घरी परतत होता. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या आरोपींनी रस्त्यातच त्याच्यावर गोळीबार केला. परिसरात नागरिकांची ये-जा सुरू असतानाही हल्लेखोरांनी हा गोळीबार केल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. गोळीबारानंतर आरोपी तातडीने घटनास्थळावरून पळून गेले. गोळी लागल्यानंतर जखमी अवस्थेत बंटी जहागीरदारला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## पुण्यात शिवसेनेच्या युवा नेत्याची मुजोरी नडली

### प्रतिस्पर्ध्याचे एबी फॉर्म फाडलं; थेट पोलीस ठाण्यात रवानगी

**पुणे, ता. १ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीदरम्यान प्रतिस्पर्धी उमेदवाराचा एबी फॉर्म फाडून तो गिळल्याचा आरोप असलेल्या शिवसेनेच्या एका उमेदवाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी धनकवडी सहकारनगर येथील वॉर्ड कार्यालयात घडली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी शिवसेनेचे उमेदवार उद्धव कांबळे (वय ३४) यांच्याविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १५ जानेवारी रोजी होणाऱ्या पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ३४ मध्ये शिवसेनेने दोन उमेदवारांना एबी फॉर्म दिले होते. या बाबीवरून शिवसेनेचे उमेदवार उद्धव कांबळे आणि मच्छिंद्र ढवळे यांच्यात वाद निर्माण झाला. वॉर्ड कार्यालयात सुरू असलेल्या या वादाचे रूपांतर जोरदार शाब्दिक वादात झाले. वादाच्या दरम्यान कांबळे यांनी ढवळे यांचा एबी फॉर्म जबरदस्तीने हिसकावून घेतला, तो फाडला आणि फाडलेले तुकडे गिळल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. निवडणूक कामासाठी उपस्थित असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणल्याप्रकरणी कांबळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून संबंधित सर्व बाबी तपासल्या जात आहेत. फॉर्म अ आणि फॉर्म ब हे निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाचे कागदपत्रे असतात. या फॉर्मच्या माध्यमातून राजकीय पक्ष एखाद्या उमेदवाराला अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करतो.

# लोणी काळभोर येथे दोन गटात फ्री स्टाईल हाणामारी; दोघे जण जखमी तर ११ जणांवर गुन्हे दाखल

**लोणी काळभोर, ता. १ :** किरकोळ कारणावरून दोन गटात शिवीगाळ करून लोखंडी गज व लाकडी दांडक्याने तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील इनामदार वस्ती परिसरात बुधवारी (ता.३१) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हाणामारीत दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अकरा जणांच्या विरोधात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहीदा मुबारक इनामदार (वय ५०, रा. इनामदार वस्ती, बाजारमळा रोड, लोणीकाळभोर, ता. हवेली, जि. पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मनसुर गनी इनामदार (वय ४५), रिहान मन्सुर इनामदार (वय, २३), जैद मन्सुर इनामदार (वय २५), निहाल खालीद इनामदार (वय २०) व खालीद गनी इनामदार (वय ४५ सर्व रा. इनामदार वस्ती, लोणी काळभोर ता. हवेली जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर मनसुर गनी इनामदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हरुन इब्राहिम इनामदार (वय ५०) रेश्मा हरून इनामदार (वय ४५) परवेझ हरुन इनामदार (वय २२), शायरान (वय ५५), शाहरुख नजीर शेख (वय ३०) व करीन इनामदार (वय २६, सर्व रा. इनामदार वस्ती, लोणी काळभोर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शहीदा इनामदार यांचा भाचा शाहरुख नजीर शेख याच्या रिक्षाचा



धक्का मनसुर गनी इनामदार याच्या मोटार सायकलीस लागला होता. याच कारणावरुन आरोपींनी फिर्यादी शहीदा इनामदार यांचा भाचा शाहरुख नजीर शेख, पुतण्या परवेझ हरुण इनामदार व फिर्यादी शहीदा इनामदार यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच फिर्यादी शहीदा इनामदार यांचे दिर हरुण इब्राहिम इनामदार यांना निहाल इनामदार याने त्याच्या जवळ असणाऱ्या लोखंडी हत्याराने कपाळावर व पाठीवर मारहाण केली आहे. याप्रकरणी शहीदा इनामदार यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वरील पाच आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२) (३), १८९(१), १८९(२), १८९ (४), भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५). सह महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७(१) (२) (३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद जगताप करत आहेत.

**दुसऱ्या घटनेत, फिर्यादी मनसुर इनामदार**


हे त्यांच्याकडील ओला कंपनीची मोटार सायकल राहत्या घराच्या पार्कीगमधुन बाहेर काढत होते. तेव्हा शाहरुख शेख हा त्याची रिक्षा घेवुन आला व फिर्यादी मनसुर इनामदार याच्या मोटार सायकलीस धडक देवुन शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी मनसुर इनामदार, त्यांची पत्नी आशिया, त्यांचे मुले रिहान व निहाल यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देवुन दगडाने मारहाण केली. तर आरोपी परवेझ इनामदार याने त्याच्या हातामधील लोखंडी हत्याराने फिर्यादी मनसुर इनामदार यांचा मुलगा निहाल यास मारहाण करुन जखमी केले. आरोपी हरुन इनामदार याने त्याच्या हातामधील लाकडी दांडक्याने रिहान यास मारहाण करुन जखमी केले आहे.

दरम्यान, या मारहाणीत हरुण इब्राहिम इनामदार व निहाल इनामदार हे दोघेजण जखमी झाले असून त्यांच्यावर दवाखान्यात उपचार सुरू आहेत. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ११ जणांच्या विरोधात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करत आहेत.

# पुण्याच्या प्रभाग २३ मध्ये आंदेकर विरुद्ध कोमकर यांच्यात लढत

### वर्चस्वाचा लढा आता निवडणुकीच्या मैदानात

**पुणे, ता. १ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक २३ मध्ये एक अतिशय थरारक आणि वेगळा राजकीय संघर्ष पाहायला मिळत आहे. शहरातील रविवार पेठ आणि नाना पेठ या भागात वर्चस्व असलेल्या आंदेकर आणि कोमकर या दोन कुटुंबांमधील जुने आता चक्क मतदानाच्या मैदानात उतरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आंदेकर कुटुंबातील दोन महिलांना, म्हणजे लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना उमेदवारी दिली आहे. या निर्णयामुळे संतापलेल्या कल्याणी कोमकर यांनी थेट अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी आपला उमेदवारी अर्जही दाखल केला आहे.



कल्याणी कोमकर या आयुष कोमकर यांच्या आई आहेत आणि त्यांनी यापूर्वीच इशारा दिला होता की, जर आंदेकर कुटुंबाला तिकीट दिले तर त्या टोकाचे पाऊल उचलतील. मात्र, पक्षाने आंदेकर कुटुंबालाच झुकते माप दिल्याने त्यांनी आता थेट निवडणुकीतून आव्हान देण्याचे ठरवले आहे. विशेष म्हणजे, माजी नगरसेवक वनराज आंदेकर आणि आयुष कोमकर यांच्या खून प्रकरणानंतर या दोन कुटुंबांमधील रक्ताचे नाते कायमचे संपले असून त्याचे रूपांतर भीषण वैमनस्यात झाले आहे.

एकाच प्रभागात आणि एकाच कुटुंबातून आलेल्या या परस्परविरोधी उमेदवारांमुळे स्थानिक मतदारांमध्ये नागरिक कोणाला पाठिंबा देणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे. एकेकाळी एकत्र असलेल्या या कुटुंबातील महिला आता एकमेकींविरुद्ध उभ्या ठाकल्याने, प्रभाग २३ ची ही लढत केवळ सत्तेसाठी नसून ती वर्चस्वाची लढाई बनली आहे. पुण्याच्या या हायव्होल्टेज निवडणुकीत जनता कोणाच्या बाजूने कौल देते, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# मित्रांसोबत थर्टी फर्स्ट एन्जॉय करायला गेलेल्या एकाचा दरीत कोसळून मृत्यू

**सातारा, ता. १ :** नववर्षाच्या स्वागतासाठी साताऱ्यातील निसर्गरम्य परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. आपल्या मित्रांसोबत थर्टी फर्स्टची पार्टी करण्यासाठी गेलेला एकयुवक अचानक बेपत्ता झाला. मित्रांनी शोधाशोध केली, मात्र त्याचा काहीच पत्ता लागला नाही. अखेर या प्रकरणाचा उलगडा झाला तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.




मिळालेल्या माहितीनुसार, क्षेत्रमाहुली येथील आदित्य कांबळे हा युवक ३१ डिसेंबरच्या रात्री आपल्या मित्रांसोबत कास पठाराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये पार्टीसाठी गेला होता. सर्व मित्र पार्टीमध्ये मग्न असताना, हॉटेलजवळ असलेल्या दरीचा अंदाज अंधारामुळे आदित्यला आला नाही. चालत असताना अचानक त्याचा पाय घसरला आणि तो सुमारे ४०० फुट खोल दरीत कोसळला. हा प्रकार लक्षात येताच मित्र घाबरून गेले आणि त्यांनी तातडीने मदतीसाठी संपर्क साधला.

घटनेची माहिती मिळताच साताऱ्यातील छत्रपती शिवेंद्रराजे ट्रेकर्सच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मध्यरात्रीची वेळ, कडाक्याची थंडी आणि पूर्ण अंधार अशा कठीण परिस्थितीतही ट्रेकर्सनी बचावकार्य सुरू केले. दोरखंड, टॉर्च आणि इतर साहित्याच्या मदतीने ट्रेकर्स सुमारे ४०० फुट खाली उतरले. शोध घेतल्यानंतर आदित्य जखमी अवस्थेत आढळून आला.

सुमारे ३ ते ४ तास चाललेल्या थरारक बचावकार्यानंतर ट्रेकर्सच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या मेहनतीने आदित्यला सुरक्षितपणे दरीतून बाहेर काढले. बाहेर काढल्यानंतर त्याला तातडीने सातारा जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या अंगावर अनेक ठिकाणी जखमा असून सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

आदित्यने सांगितले की, ३१ डिसेंबरची पार्टी करत असताना परिसर पाहण्यासाठी मित्रांसोबत जात असताना त्याचा तोल गेला आणि तो दरीत कोसळला. वेळेत मदत मिळाल्याने त्याचा जीव वाचला, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. या घटनेमुळे कास पठार परिसरात एकच चर्चा सुरू झाली असून पर्यटकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## ड्रिंक्स घेताय? 'ही' पेये तुमच्या आरोग्यासाठी आहेत अत्यंत घातक

**पुणे :** नवीन वर्षाचा आनंद साजरा करताना अनेकजण मद्यपानाला पसंती देतात, पण हा अतिउत्साह शरीरासाठी खूप घातक ठरू शकतो. थर्टी फर्स्टच्या सेलिब्रेशनमध्ये अशा काही पेयांचा वापर केला जातो जी चवीला गोड असली तरी आरोग्यावर वाईट परिणाम करतात. डॉक्टरांच्या मते, पार्टीत अतिप्रमाणात साखर आणि रसायने असलेल्या ड्रिंक्सचे सेवन केल्याने केवळ हँगओव्हर होत नाही, तर यकृत, हृदय आणि पचनसंस्थेचे मोठे नुकसान होते. वर्ष २०२६ ची सुरुवात आरोग्यदायी करण्यासाठी काही विशिष्ट पेयांपासून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे. पार्टीमध्ये सर्वाधिक पसंती मिळणारी हाय-शुगर कॉकटेल ही आरोग्यासाठी मोठी शत्रू आहेत. यामध्ये दारूसोबत फ्लेवर्ड सिरप आणि सॉफ्ट ड्रिंक्स मिसळले जातात, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढते. तसेच, आजकाल तरुण मुले दारूमध्ये एनर्जी ड्रिंक्स मिक्स करून पितात, जे सर्वात जास्त धोकादायक मानले जाते. या मिश्रणामुळे हृदयाची धडधड वेगाने वाढते आणि रक्तदाबाचा गंभीर त्रास होऊ शकतो. बिअरबाबत अनेकांचा असा गैरसमज असतो की ती सुरक्षित आहे, पण त्यातील जास्त कॅलरीजमुळे वजन वेगाने वाढते आणि शरीरातील पाणी कमी होऊन थकवा जाणवतो.

एकापाठोपाठ एक स्ट्राँग दारूचे शॉट्स घेण्याच्या पद्धतीमुळे लिव्हरवर मोठा ताण येतो आणि यामुळे चक्कर येणे किंवा उलट्या होण्याचा धोका असतो. जे लोक मद्यपान करत नाहीत ते मॉकटेल किंवा पॅकेज्ड ड्रिंक्स घेतात, मात्र त्यातही मोठ्या प्रमाणावर कृत्रिम रंग आणि साखर असते जी पचन बिघडवते. डॉक्टरांच्या मते, नवीन वर्षात निरोगी राहायचे असेल तर मद्यपान मर्यादित ठेवावे आणि रिकाम्या पोटी पिणे टाळावे. त्याऐवजी नारळ पाणी किंवा लिंबू पाणी यांसारख्या नैसर्गिक पर्यायांची निवड करणे फायदेशीर ठरते. सेलिब्रेशन करताना आरोग्याला प्राधान्य दिल्यास तुमचे पूर्ण वर्ष सुखकर जाऊ शकते.

## संक्षिप्त

### तरुणाची भरबाजारात चाकूने भोसकून हत्या

**जळगाव, ता. १ :** जळगावमधील गजबजलेल्या गोलाणी मार्केट परिसरात बुधवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. एका तरुणीसोबत असलेल्या मैत्रीच्या वादातून साई गणेश बोराडे या तरुणाची हत्या करण्यात आली आहे. संशयित आरोपी शुभम सोनवणे याने साईचा पाठलाग करून त्याच्यावर चाकूने हल्ला केला. या घटनेमुळे संपूर्ण बाजारपेठेत भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साई आणि शुभम यांच्यात एका मुलीवरून गेल्या ३ वर्षांपासून वाद सुरू होता. साईचे त्या तरुणीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय शुभमला होता. याच रागातून बुधवारी दुपारी दोघांमध्ये गोलाणी मार्केटजवळ भांडण झाले. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि शुभमने साईच्या छातीवर व पोटावर चाकूने वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या साईला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ज्यावेळी हा हल्ला होत होता, त्याचवेळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे कर्मचारी रमेश चौधरी तिथून जात होते. त्यांनी प्रसंगवधान राखून आरोपी शुभमला जागीच पकडले आणि शहर पोलिसांच्या ताब्यात दिले. मयत साई हा देवकर कॉलेजमध्ये डिप्लोमाच्या २ व्या वर्षात शिकत होता. दिवसाढवळ्या झालेल्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रहाटणीत भरधाव क्रेनच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**पिंपरी चिंचवड, ता. १ :** पिंपरी चिंचवडमधील रहाटणी भागात वर्षाच्या शेवटच्या दिवशी नखाते चौकात रस्ता ओलांडणाऱ्या एका वर्षांच्या वृद्ध महिलेला भरधाव हायड्रोलिक क्रेनने चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. लक्ष्मीबाई खाणेकर असे या मृत महिलेचे नाव असून त्या ताथवडे येथील रहिवासी होत्या. बुधवारी ३१ डिसेंबर रोजी दुपारी ३ च्या सुमारास ही दुर्घटना घडली. नातेवाईकांची भेट घेण्यासाठी वृद्ध महिला रहाटणीत गेल्या होत्या. नातेवाईकांना भेटून झाल्यानंतर त्या नखाते चौकातील एका स्टुडिओत फोटो काढण्यासाठी गेल्या होत्या. तिथून परतत असताना रस्ता ओलांडताना उजव्या बाजूने आलेल्या क्रेनने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की लक्ष्मीबाई क्रेनच्या चाकाखाली चिरडल्या गेल्या आणि त्यांचा तिथेच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच काळेवाडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उपनिरीक्षक शंतनू निंबाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित क्रेन चालकावर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरु आहे.

# राज्यात होणार नवीन सहा पदरी ग्रीनफिल्ड, ॲक्सेस कंट्रोल्ड महामार्ग

**मुंबई, ता. १ :** नववर्षाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारकडून घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीतनाशिक-सोलापूर-अक्कलकोट सहापदरी ग्रीनफिल्ड, ॲक्सेस कंट्रोल्ड महामार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील दळणवळण व्यवस्था अधिक आधुनिक, सुरक्षित आणि वेगवान करण्याच्या दिशेने हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.



हा ॲक्सेस कंट्रोल्ड महामार्ग सुमारे ३७४ किलोमीटर लांबीचा असून यासाठी अंदाजे १९,१४२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प पूर्णतः टोल आधारित पद्धतीने राबवण्यात येणार आहे. यामुळे राज्याच्या तिजोरीवर कोणताही थेट आर्थिक भार पडणार नाही. पुढील दोन वर्षांत हा महामार्ग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

दरम्यान, या बैठकीत ओडिशातील एनएच-३२६ च्या सुधारणा प्रकल्पालाही मान्यता देण्यात आली. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, नाशिक-सोलापूर-अक्कलकोट महामार्ग हा सुरत-चेन्नई हायस्पीड कॉरिडोरचा महत्त्वाचा भाग असून, पश्चिम व दक्षिण भारत यांना अधिक वेगाने आणि थेट जोडणारा ठरेल. त्यामुळे प्रवासाचा वेळ आणि अंतर कमी होणार आहे.


या ग्रीनफिल्ड कॉरिडोरचा थेट लाभ नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांना होणार आहे. हा महामार्ग दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वे, नाशिक परिसरातील आग्रा-मुंबई महामार्ग (एनएच-६०) तसेच समृद्धी महामार्गाशी जोडण्यात येणार आहे. या बहुआयामी दळणवळण जाळ्यामुळे औद्योगिक, व्यापारी आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील हालचाली अधिक गतिमान होण्यास मदत होणार आहे.

नव्या मार्गामुळे सध्याच्या तुलनेत प्रवासाचा कालावधी सुमारे १७ तासांनी कमी होणार असून, अंतरात सुमारे २०१ किलोमीटरने कमी होणार आहे. परिणामी इंधन, वाहतूक आणि मालवाहतुकीचा खर्च लक्षणीयरीत्या घटण्याची अपेक्षा आहे. हा महामार्ग बिल्डऑपरेट ट्रान्स्फर या तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. हा महामार्ग आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि मूल्यवान प्रकल्प असल्याचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे. या प्रकल्पाच्या यशानंतर रेल्वे व इतर क्षेत्रांतही अशीच कार्यपद्धती राबवण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

अशा प्रकारे हा महामार्ग पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला नवे बळ मिळेल. लॉजिस्टिक्सची कार्यक्षमता वाढणार असून प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच पश्चिम व दक्षिण भारतातील व्यापार, पर्यटन व वाहतूक अधिक वेगाने होण्यास मदत होणार आहे.

## केदार जाधवांनी उघड केला निवडणुकीपूर्वीचा सर्वात मोठा घोटाळा

**मुंबई, ता. १ :** रोहित पवार यांच्या अडचणी आता चांगल्याच वाढताना दिसत आहेत. कारण आता थेट भारताचा माजी क्रिकेटपटू केदार जाधव रोहित पवार यांच्या विरोधात मैदानात उतरला आहे. इतकंच नाही तर केदार जाधवने रोहित पवारांना थेट कोर्टात खेचल्याने हे प्रकरण आता अधिकच गंभीर झालं आहे.



नेमकं प्रकरण काय आहे तर, रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) कार्यकारिणीने अलीकडेच क्रिकेटशी थेट संबंध नसलेल्या तब्बल ४०० जणांना आजीव सदस्यत्व दिलं. धक्कादायक बाब म्हणजे यातील बहुतांश लोक हे पवार यांचे नातेवाईक किंवा जवळचे असल्याचा आरोप केला जात आहे. सदस्यत्व देताना कोणतेही नियम पाळले गेले नाहीत, सगळं मनमानी पद्धतीने झाल्याचं केदार जाधवचं म्हणणं आहे.

हीच कथित घराणेशाही थांबवण्यासाठी केदार जाधव आणि लातूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष कमलेश ठक्कर यांनी थेट उच्चन्यायालयात धाव घेतली आहे. या सदस्यवाढीमुळे एमसीएची सदस्यसंख्या अवघ्या काही काळात वरून थेट वर पोहोचली आहे. हा सगळा प्रकार येणारी निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच करण्यात आला असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे रोहित पवार यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ आता संपत आला आहे. ६ जानेवारीला एमसीएची निवडणूक आणि मतमोजणी होणार आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रातील क्रिकेटचं भवितव्य कोर्टाच्या निर्णयावर अवलंबून राहणार असल्याची भावना अनेक माजी खेळाडूंनी व्यक्त केली आहे. धर्मादाय आयुक्तांच्या नियमांनुसार, संघटनेचे सदस्य वाढवायचे असतील तर त्यासाठी ठराव मांडणं, पुढील बैठकीत त्याला मंजुरी मिळवणं आणि वार्षिक सभेत तो विषय घेणं आवश्यक असतं. पण या प्रकरणात एकही नियम पाळलेला नाही, असा आरोप करण्यात आला आहे. एमसीएची शेवटची बैठक १३ डिसेंबरला झाली होती. त्यात ऐनवेळी सदस्यवाढीचा मुद्दा घुसवण्यात आला. एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने त्याला विरोधही केला, पण तो दुर्लक्षित करण्यात आला. यानंतर २५ डिसेंबरला प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आली. त्यावर केदार जाधव आणि कमलेश ठक्कर यांनी २६ डिसेंबरला निवडणूक अधिकाऱ्यांकडे हरकत नोंदवली होती. मात्र ती हरकत फेटाळण्यात आली. अखेर याच सगळ्या मुद्द्यांवरून दोघांनीही कोर्टात याचिका दाखल केली आहे.

रोहित पवार यांच्यावर थेट नियमबाह्य कारभार आणि घराणेशाहीचा आरोप झाल्याने राजकीय आणि क्रीडा वर्तुळात खळबळ उडाली आहे. आता केदार जाधवला कोर्टात किती यश मिळतं, आणि याचा एमसीए निवडणुकीवर काय परिणाम होतो, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

## बार्शी येथे झालेल्या भीषण कार अपघातात दोन मित्राचा मृत्यू

**बार्शी, ता. १ :** बार्शी तालुक्यातील खांडवी येथे मंगळवारी सायंकाळी एक मोठी दुर्घटना घडली. पुण्याला जाण्यासाठी निघालेल्या एका कारचा भीषण अपघात झाला असून यामध्ये दोन मित्रांना आपला जीव गमवावा लागला आहे. ही घटना सायंकाळी ७:३० ते ८ च्या दरम्यान घडली जेव्हा रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रॅक्टरला कारने मागून धडक दिली. त्या ट्रॅक्टरमध्ये लोखंडी सळ्या भरलेल्या होत्या आणि त्याला नंबर प्लेटही नव्हती. अंधारामुळे चालकाला समोर उभ्या असलेल्या ट्रॉलीचा अंदाज आला नसावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

या अपघातात कार चालवणारे नामदेव शिवाजी पालखे (वय ४३) आणि निलेश भिकाजी केकान (वय ४५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. मृत नामदेव हे पिंपळगावचे रहिवासी होते तर निलेश हे करमाळा तालुक्यातील शेलगावचे होते. कारमध्ये असलेले इतर तीन प्रवासी देखील या धडकेत गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये महिला आणि वृद्धांचा समावेश असून त्यांना तातडीने उपचारासाठी बार्शीतील एका दवाखान्यात हलवण्यात आले आहे. शिवशाला हांगे, भिकाजी केकाण आणि निशा केकान अशी जखमींची नावे आहेत.

कुलदीप काळे यांची कार घेऊन नामदेव पालखे हे आपल्या ओळखीच्या लोकांना पुण्याला सोडण्यासाठी निघाले होते. मात्र खांडवी गावाजवळ कुईवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रॅक्टरने काळ बनून त्यांचा मार्ग रोखला. धडक इतकी जोरदार होती की, कारचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## दारूच्या नशेत चालकाने माय-लेकांचा घेतला बळी; तेलवडी परिसरात भीषण अपघात!

इम्रान आत्तार

**पुणे, ता. १ :** भोर-पुणे मार्गावर कासुर्डी गावाच्या हद्दीत ४ : ३० ते ५ वाजे दरम्यान कार आणि दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीवरून जाणाऱ्या माय-लेकाचा जागीच मृत्यू झाला असून, कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदा लक्ष्मण धावले आणि त्यांचा मुलगा अमृत लक्ष्मण धावले (दोघेही रा. तेलवडी, ता. भोर) हे दोघे दुचाकीवरून आपल्या शेताकडे जात होते. कासुर्डी गावाच्या हद्दीत समोरून येणाऱ्या एका भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दोघेही गंभीर जखमी झाले.



अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालक हा पूर्णपणे मद्यधुंद अवस्थेत होता. कारची तपासणी केली असता, गाडीमध्ये दारूच्या बाटल्या, पाण्याचे ग्लास आणि शेंगदाणे आढळून आले आहेत. यावरून मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. स्थानिकांनी जखमी माय-लेकांना तात्काळ जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारांपूर्वीच मृत घोषित केले. एकाच कुटुंबातील दोघांचा अशा दुर्दैवी मृत्यू झाल्याने तेलवडी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच राजगड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केलाआहे. पोलिसांनी कारचालकाला ताब्यात घेतले असून, पुढील तपास राजगड पोलीस करत आहेत. 'ड्रंक अँड ड्राईव्ह'मुळे दोन निष्पाप जीवांचा बळी गेल्याने आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पुणे पोलिसांनी अमली पदार्थांच्या विक्री करणाऱ्या तरुणाला रंगेहाथ पकडले

**पिंपरी चिंचवड, ता. १ :** पिंपरी चिंचवड शहरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात पोलिसांनी आता कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. याच मोहिमेअंतर्गत भोसरी पोलिसांनी एका २५ वर्षांच्या तरुणाला अमली पदार्थांसह अटक केली आहे. अक्षय रामभाऊ माने असे या पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो भोसरीमधील सद्गुरूनगर परिसरात राहतो. ही घटना २९ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास इंद्रायणीनगर भागात घडली आहे. परिसरातील एका नाल्याजवळ हा तरुण गांजा विकण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनुसार पोलिसांनी त्या ठिकाणी पाळत ठेवून सापळा रचला होता. संशयास्पदरित्या फिरणाऱ्या अक्षयला थांबवून जेव्हा पोलिसांनी त्याच्या पिशवीची तपासणी केली, तेव्हा त्यात मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. या प्रकरणी पोलिसांनी एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.




अमली पदार्थांचे हे जाळे शहरात किती खोलवर पसरले आहे, हे गेल्या काही दिवसांतील घटनांवरून स्पष्ट होत आहे. नुकतेच हिंजवडी परिसरात एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये चालणाऱ्या हायटेक ड्रग्ज शेतीचा पोलिसांनी पर्दाफाश केला होता.

पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकू नये, यासाठी पोलीस आता अधिक सतर्क झाले असून अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांचे धागेदोरे कुठपर्यंत आहेत, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. शहरात अशा प्रकारे छुप्या पद्धतीने अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## शिवरे फ्लायओव्हरजवळ अपूर्ण रस्त्यामुळे अपघातांचा धोका

### दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना वाढल्या

**भोर, ता. ३१ :** पुणेसाताराराष्ट्रीय महामार्गावरील शिवरे गावाच्या हद्दीतील फ्लायओव्हर परिसरात रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः साताऱ्याकडून पुण्याकडे येताना महामार्गालगतचा रस्त्याचा भाग अचानक उंचसखल झाल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.

या ठिकाणी रस्त्याचे काम अद्याप पूर्ण न झाल्यामुळे काही अंतरावर अचानक उंच-खालचा भाग तयार झाला आहे. वेगात येणाऱ्या वाहनचालकांना या बदलाचा अंदाज न आल्याने वाहनाचे संतुलन बिघडते आणि अपघात होतात. सुदैवाने आतापर्यंत गंभीर जीवितहानी टळली असली तरी काही दुचाकीस्वार जखमी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.



पुणेसातारा हा अत्यंत वर्दळीचा राष्ट्रीय महामार्ग असून दररोज हजारो वाहने या मार्गावरून प्रवास करतात. मात्र शिवरे फ्लायओव्हर परिसरातील अपूर्ण रस्त्यामुळे हा भाग सध्या अपघातप्रवण ठरत आहे. रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात हा धोका अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिक तसेच नियमित प्रवासी वाहनचालकांनी या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोल नाका प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्त्याची दुरुस्ती करावी, उंचसखल भाग समतल करावा तसेच योग्य सूचना फलक व वेगमर्यादा लावाव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

दरम्यान, वेळीच दखल न घेतल्यास भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित यंत्रणांनी तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## शरीर सुखाची मागणी नाकारली म्हणून तिकीट कापलं; सुषमा शेलारांचा मोठा गौप्यस्फोट

### शिवसेनेचे माजी आमदार गौतम चाबुकस्वारांवर खळबळजनक आरोप

**पिंपरी, ता. १ :** जे दाखवायचं ते दाखवत नाहीस असे बोलून पिंपरीचे माजी आमदार गौतम चाबुस्कावर यांनी महानगरपालिका निवडणुकीचे तिकीट कापल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पिंपरी विधानसभा समन्वयक सुषमा शेलार यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना शेलार म्हणाल्या की, शिवसेनेमध्ये गेले आठ वर्ष झाले काम करत असून पिंपरी विधानसभा समन्वयक म्हणून पक्ष वाढीसाठी काम केले आहे. पक्ष न्याय देईल या हेतूनेच प्रभागांमध्ये अनेक उपक्रम राबवले व अनेक समाज उपयोगी कामे केली आहेत. कामे करत असताना पक्षाचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार यांनी वारंवार शारीरिक मागणी करून हीन वागणूक दिली आहे. कामानिमित्त त्यांच्या पिंपरीतील कार्यालयात भेटण्यासाठी अनेक वेळा गेले तेव्हा त्यांनी अश्लील नजरेतून बघत खूप छान दिसतेस, आज साडी चांगली आहे म्हणत जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. पक्षाचे काम न करणाऱ्या निष्क्रीय गोपाळ मोरे या कार्यकर्त्याला तिकीट न दिल्यास राजीनामा देण्याचा दबाव पक्षावर चाबुस्कावर यांनी आणला. एका कार्यकर्तासाठी जिल्हा प्रमुख राजीनामा देतो का? या गोष्टीचा पक्षाने विचार करावा? पक्षाला वेठीस का धरले होते ?



याचा खुलासा मी मीडिया समोर केला आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी कासारवाडी येथे प्रचार करत असताना एका बिल्डिंगमध्ये प्रचारासाठी गेलो असता लिफ्टमध्ये त्यांनी मागून पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसात धाव घेण्यासाठी प्रयत्न केले परंतु चाबूस्वार यांनी तुला आयुष्यातून उठवेल अशी धमकी दिली. त्यामुळे घाबरून या घटनेची कुठेही वाच्यता केली नाही. काही दिवसांपूर्वी आकुर्डी येथील शिवसेना कार्यालयामध्ये बैठकीनिमित्त गेले असता तिथे त्यांना पक्षांमध्ये काम केले आहे आता किती काम दाखवू असे बोलले असता त्यांनी जे दाखवायचे ते दाखवत नाही असे अश्लील हावभाव करून शरीर सुखाची मागणी केली.

मागील आठवड्यात कामानिमित्त महानगरपालिकेत गेले असता अचानक चाबुकस्वार यांची भेट झाली तेव्हा त्यांना तिकटासाठी अडवणूक करू नका, निवडून आल्यास जिल्हा प्रमुख म्हणून तुमचेच नाव होणार आहे असे बोलले होते. त्यावर चाबुकस्वार यांनी तुला पहिल्यापासून सांगत आलोय कॉम्प्रोमाइज कर तिकीट फिक्स होईल असे बोलून अप्रत्यक्षरीत्या शरीर सुखाची मागणी केली. सततच्या मागण्यांना नकार देत आल्यामुळेच तिकीट कापले आहे असे मत शेलार यांनी व्यक्त केले.